Vol 5 Issue 10 July 2016

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Welcome to Review Of Research

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2249-894X

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 10 | July - 2016

International Online Multidisciplinary Journal
Review of Research
ISSN No : 2249-894X
Impact Factor : 3.1402 (UIF) [2015]
Save Tree, Save Paper, Save World

Review Of Research

# ''सर्वसमावेशक शिक्षणासमोरील आव्हाने''

डॉ.सौ. उज्ज्वला के.सदावर्ते
प्राचार्या,विवके वर्धिनी अध्यापिका महाविद्यालय,नांदेड
तथा,अधिष्ठाता,शिक्षणशास्त्र विद्याशाखा,स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड.

**सारांशः—**
शिक्षण माणसांच्या विकासाचे साधन मानले जाते. शिक्षणाच्या विविध पैल्लुंची चर्चा सातत्याने होते त्यातील एक पैलु म्हणजे सर्वसमावेशक शिक्षण होय. सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे शिक्षणप्रवाहात सर्वांचा समावेश 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकांना शिक्षणाचा घटनात्मक हक्क आहे त्यानुसार विशेष गरजा असणारे मुल सर्वसामान्य शाळेत सामावून घेणे म्हणजे सर्वसमावेशक शिक्षण होय. सर्वसमावेशक शिक्षण प्रणाली राबवीत असतांना विविध समस्या आव्हाने म्हणून उभी रहातात. त्यात संकल्पनेची अनभिज्ञते पासुन आर्थिक, भौतिक साधनाची कमतरता, सामाजिक, कौटुंबिक, उदासिनता, प्रशासकीय पातळीवरचे प्रयत्न आणि त्यास मिळणारा प्रतिसाद हया सर्वांचा दुवा म्हणजे शिक्षक होय. हया शिक्षकाला विविध आव्हाने उपरोक्त वर्णनानुसार आपले कार्य पार पाडतांना उभे राहतात. अशा सर्व आव्हानांची चर्चा प्रस्तुत लेखात करण्यात आली आहे.



**प्रास्ताविकः—**
माणसाच्या गती व प्रगतीचे साधन म्हणजे शिक्षण होय. शिक्षण म्हणजे अशा सर्व प्रकारच्या प्रक्रियांचे एकत्रीकरण की ज्यामुळे व्यक्ति तिच्या क्षमता, अभिवृत्ती, व ती रहात असलेल्या सामाजिक वर्तणुकीच्या घाटांचा विकास करते. परंतु समाजातील प्रत्येक व्यक्ति हया प्रक्रियेचा घटक आहे कां? तर याचे उत्तर दुर्देवाने नाही असे दयावे लागते. आपण गुणगान करतो की 21 वे शतक माहितीचे, जागतिक महासत्ता बनण्याचे मात्र वंचित, विशेष, निरक्षर, शालाबाहय असे अनेक संकल्पना आहेत की वरील प्रश्नाच्या उत्तराची वास्तविकता समोर आणतात. प्रगत ज्ञान, तंत्रज्ञान आणि व्यवस्थेत अनेक प्रयत्न हया संकल्पनात्मक समस्या दुर करण्यासाठी आपआपल्या स्तरावर प्रयत्न करीत आहे. त्यातील एक प्रयत्न म्हणजे सर्व समावेशक शिक्षण प्रक्रिया होय.

सर्व समावेशक शिक्षण म्हणजे शिक्षणप्रवाहात सर्वांचा समावेश 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक बालकांना शिक्षणाच्या घटनात्मक हक्क आहे त्यानुसार विशेष गरजा असणारे मुल सर्वसामान्य शाळेत सामावून घेणे म्हणजे सर्व समावेशक शिक्षण होय.

सर्व समावेशक शिक्षणाच्या व्यापक कार्य क्षेत्राचा विचार करिता त्या समोरील आव्हाने देखील तितकीच मोठी आहेत. त्यांचा विचार सदर चर्चेद्वारे करण्याचा हा एक प्रयत्न.

प्रत्येक बालकाच्या शारीरीक, मानसिक, बौध्दिक गरजा आणि क्षमता वेगवेगळया असतात. प्रत्येकाची शैक्षणिक गरज वेगळी असते, त्यानुरुप त्याला साधन, सुविधा, पुरविणे हे शिक्षण पुरविणा—या माध्यमांचे कार्य असते. समावेशक शिक्षण म्हणजे समाजातील सर्व मुलांसाठी जाणिवपुर्वक शाळेची रचना ज्या शाळेत सर्व प्रकारच्या मुलांच्या शिक्षणाची सोय होऊ शकेल. 1994 मध्ये स्पेन देशात सलमानका या ठिकाणी शैक्षणिक परिषदेत समावेशक शिक्षणाला मुर्त रुप देण्यात आले. भारतात युनिसेफच्या सहकार्याने ख—या अर्थाने 1996 मध्ये एकात्मिक शिक्षण कार्यक्रमाच्या रुपाने सर्व समावेशक शिक्षणाला चालना प्राप्त झाली आणि त्या विषयी आव्हाने देखील उभी राहिली ती पुढील प्रमाणे.

### 1) सर्वसमावेशक हया संकल्पनेविषयी अनभिज्ञताः—

शिक्षणातील विविध संकल्पना ज्ञात आहे त्यात सर्व समावेशक शिक्षण म्हणजे केवळ अपंगाचे शिक्षण हा समज अनभिज्ञतेचे लक्षण

मानले जाते सर्व समावेशक शिक्षणात अपंग, वंचित, शालाबाहय, निरक्षर, दुर्गम भागातील शिक्षणापासून दुर अश्या सर्वाच्या शिक्षणाचा समावेश होतो. आणि हया सर्वांना सर्वसामान्य शैक्षणिक प्रवाह व शाळेशी जोडणे म्हणजे सर्व समावेशकता हया विषयी समाज व शैक्षणिक स्तरात जाणीव होणे गरजेचे आहे. ही अनभिज्ञता दुर करणे हे एक वेगळे आव्हान आहे.

### *2) प्रशिक्षित शिक्षकांचा अभावः—*

आपल्या शैक्षणिक व्यवस्थेत सेवांतर्गत आणि सेवापूर्व प्रशिक्षण हे शिक्षकासाठी सर्वश्रुत आहे त्यात विशेष शिक्षण आणि सर्व सामान्य शिक्षण हे दोन मुख्य भाग ही आहेत मात्र परिपूर्णतेचा अभाव यात दिसतो परिणामी सामान्य शिक्षण घेतांना असामान्याची वैशिष्टे आणि त्यासाठीची शैक्षणिक पध्दती अमलांत आणणारे प्रशिक्षण अभ्याषणे दिसते परिणामी शिक्षकाकडून विशेषाना सर्व सामान्य प्रवाहात आणतांना न्याय मिळेलच की नाही याबाबत साक्षंकता आहे. त्यासाठी PSTE विशेष शिक्षण कार्यक्रम सारखे उपाय गरजेचे आहे.

### *3) विशेष शिक्षणाच्या एकात्मतेची समस्याः—*

सर्वसमावेशक शिक्षणात अपंग मुलांचे विशेष गरज असणा—या मुलांचे शिक्षण हा सर्वसामान्य शिक्षणाचा अविभाज्य घटक मानला गेला आहे. मात्र विशेष हया संकल्पनेत विविधता जाणवते त्यात सुसुत्रतेचा अभाव दिसुन येतो. अंध, अल्पदृष्टी, मुकबधीर, श्रवणदोष, मानसिक विकलांगता हया विविध क्षेत्रांची कायदयात्मक एकजुटता देखील अभावाने दिसते. मुकबधीर बालकांच्या शाळेत मुक बालक, श्रवणदोष असलेले बालक, मुकबधीर दोन्ही अंगाने अपंग बालक हयांना एकाच प्रकारची वागणूक ही एक समस्या निदर्शनास येते. परिणामी अपंगत्वाची व्याख्या करणे शैक्षणिक क्षेत्रानुसार आव्हानाचे कार्य ठरते.

### *4) शैक्षणिक गरजांनुसार विशिष्ट कार्यक्रमांच्या नियोजनाचा अभावः—*

सर्व समावेशक म्हणजे सर्व सामान्य प्रवाहात समाविष्ठ करणे त्यानुसार प्रयत्न केला तर विभिन्न गरजा असलेल्या बालकांच्या विभिन्न गरजांकडे दुर्लक्ष होणे त्याचा धोका अधिक आहे. निरक्षरांची गरज वेगळी, मुकबधीरांची गरज वेगळी आणि सर्व सामान्याची गरज वेगळी परिणामी एकाच शाळेत एकाच शैक्षणिक व्यवस्थेत प्रत्येकांच्या गरजेचे शैक्षणिक सुविधा व कार्यक्रम अभावाने दिसतात म्हणजेच आव्हानात्मक परिस्थितीचे निर्माण!

### *5) सर्व समावेशक शिक्षण क्षेत्रात संशोधनाचा अभावः—*

अपंग बालकांवर संशोधन, शिक्षक शिक्षणावर संशोधन, प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षणस्तरावर संशोधन विविध संशोधने उपलब्ध आहेत. मात्र सर्व समावेशक म्हणजे त्यात एकत्रित सर्व समस्याग्रस्तांचे संशोधन अभावित आहे. त्यात प्रगती अपेक्षीत आहे. म्हणून आज तरी हे आव्हान सर्व समोवशक शिक्षणासाठी आहे हे ही तितकेच सत्य आहे.

### *6) मनोविकास कार्यांचा अभावः—*

सर्व समावेशक शाळामधून मुलाच्या संख्येच्या 10 टक्के अपंग मुलांपैकी 05 टक्के अपंग मुलाना सर्व मुलांबरोबर त्यांच्या कडे थोडेसे लक्ष पुरवुन शिक्षण प्रवाहात समाविष्ट केले जाते मात्र अन्य बालकांचे कायद्य त्यांना ख—या अर्थाने मनोविकास कार्य, मानोसपचार तज्ज्ञांच्या उपचारांची व समुपदेशनाची गरज असते मात्र त्यांचा अभाव असणे हे देखील आव्हाण ठरत आहे. महिन्यातुन मानोसपचार तज्ज्ञानांची एक कार्यशाळा, बालकांच्या मानसिक व बौधिक पातळीत वाढीसाठी मनोविकास कार्यक्रमाचे आयोजन आवश्यक आहे.

### *7) आर्थिक, भौतिक साधने व सेवा सुविधांचा अभावः—*

इतर शिक्षण क्षेत्रांप्रमाणेच सर्व समावेशक शिक्षणासाठी सरकार पुरेसा पैसा उपलब्ध करण्यात कमी पडत आहे विशेष साहित्य पुरेश्या प्रमाणात पुरविणे शासनाला महागडे पडत असल्याने ही एक आर्थिक समस्या समावेशक शिक्षणासमोरील आव्हान बनत आहे. शासन व स्थानिक प्रशासना तर्फे खडू—फळा माहिमे पासून भौतीक सोयी सुविधा पुरविण्यास प्रारंभ झाला आज मोफत पाठयपुस्तक आणि टॅब देण्यापर्यंत हया सुविधांची मजल गेली आहे. मात्र सर्वसमावेशकतेचा विचार करता एकाच ठिकाणी विभिन्न प्रकारच्या सोयी सुविधा उदा. व्हीलचेअर्स, कर्णयंत्र, युनिफार्म, आदीची रसद योग्य प्रमाणात व योग्य पध्दतीने उपलब्ध होत नाही तसेच प्रशिक्षित शिक्षक, मानसोपचार तज्ज्ञ आदींची सेवा देखील योग्य त्या स्वरुपात असल्याचा अभाव आहे हया सर्वांचा विचार करता हे देखील एक मोठे आव्हान मानले जाते.

### *8) संघटनात्मक कार्याचा अभावः—*

शैक्षणिक क्षेत्रात आज सर्वच स्तरावर शिक्षक, विदयार्थी, पालक, शिक्षकेत्तर कर्मचारी, आदीचे कार्य संघटनांच्या माध्यमातून होते मात्र विशेष वंचित, निरक्षर तेच्या आधीन वर्गांची संघटना प्रभावी रित्या कार्यरत दिसत नाही परिणामी त्यांचे प्रश्न समस्याचा निकाल लागतांना दिसत नाही. म्हणजे संघटन कार्याचा अभाव हे देखील एक आव्हान ठरत आहे.

### *9) खाजगी शिक्षण केंद्राची कमतरताः—*

सर्व सामान्यासाठी शिक्षण औपचारीक व अनौपचारीक दोन्ही पध्दतीने देण्याची सुविधा आहे खाजगी शिकवणी, विदयार्थी सहाय्यता केंद्र, आदीची रेलचेल आहे मात्र विशेष बालकांचा विचार करता अश्या सोयीची देखील कमतरता आढळते ही एक शोकांतिका म्हणावी लागेल.

### *10) वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक न्युनगंड आणि उदासीनताः–*

आपल्यात काहीतरी कमी आहे आपण इतरासारखे नाही हा विचार म्हणजे न्युनगंड हा विचार होय आणि वैयक्तिक आणि कौटुंबिक स्तरावर पहावयास मिळतो परिणामी सामान्य प्रवाहात येण्यापासून असे घटक वंचीत राहतात आणि सामाजदेखील त्या बाबत उदासिन बनतो हया सर्वांचा परिणाम त्यांना शिक्षण देतांना येणा–या अडचणीतून शैक्षणिक क्षेत्रात काम करणा–यांना सतत अनुभव देत राहतो. सर्व प्रथम न्युनगंड भाव उदासनिता ही व्यक्तिगत व कौटुंबिक स्तराकडून दुर होणे गरजेचे आहे म्हणजे समाज आपोआप त्यांना स्वीकृत करणार यात शंका नाही परंतू आता ही याच प्रतिक्षा आहे.

### *11) अनुवंशीक व आरोग्य विषयक ज्ञानाचा आणि वैयक्तिक मार्गदर्शनाचा अभावः–*

'अज्ञानाच्या अंधाराला ज्ञानाचा दिवा दुर करतो' हे एक सत्य आहे मात्र ते ज्ञान वास्तविक व योग्य स्वरुपात होणे तितकेच जरुरी आहे आरोग्य विषयक ज्ञान, अनुवंशीकतेचा दोष आदीप्रकारचे ज्ञान होणे त्यावर वंशखंडना सारखे मार्ग स्विकारुन भावी पीढी निरोगी बनविणे हया आधुनिक विचारांच्या उपायांचा आपल्या समाजात अभाव आहे, जर समस्या न्युनगंड असेल तर तो वैयक्तिक मार्गदर्शन व समुपदेशनाद्वारे दुर करण्याचे उपचार अभावाने घेतले जातात. हया सर्व समस्या सर्व समावेशकतेच्या समोर आव्हाने बनून उभ्या आहेत.

### *समारोपः–*

सर्वसमावेशक शिक्षणाच्या आव्हानांची चर्चा वरील विवरणातून आपल्या लक्षात सहज येवू शकते मात्र आपण शिक्षक शिक्षण हया क्षेत्रांतील कार्यरतांच्या पुढे देखील हया आव्हानांना पार करण्याची नैतीक जबाबदारी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष येते हे टाळता येत नाही. शासकीय स्तरावर अनेक प्रयत्न होत आहे आणि होतील मात्र आपण प्रशिक्षणांचा विचार करता प्रशिक्षणांमध्ये शिक्षण देतांना काय करु शकतो यावर विचार होणे ही काळाची मागणी आहे आणि अर्थात ही मागणी समजून घेण्यासाठी संबंधित चर्चा साहयभूत होवो ही अपेक्षा......

### *संदर्भसूचीः–*

1) भंगाळे, शै. आणि सर्व (2017). समावेशक शिक्षण. जळगांवः प्रशांत पब्लिकेशन्स.
2) दुनाखे, अरविंद. (2008). भारतीय शिक्षण पध्दती व माध्यमिक शिक्षण. पुणेः नित्यनूतन प्रकाशन.
3) जाधव, के. (2007). आधुनिक काळाचे शिक्षण समाजशास्त्र. नाशिकः मन प्रकाशन.
4) कदम, व्यंकटराव. (2012). वर्तमान शिक्षण शिक्षक – शिक्षण. नागपूरः विदया प्रकाशन.
5) पवार, ना.ग. (2007). भारतीय शिक्षणातील आधुनिक विचारप्रवाह. नागपूरः विदया प्रकाशन.
6) पंडीत, ब.बी. आणि सर्व (2009). शिक्षण शिक्षण. नागपूरः पिंपळापुरे ॲण्ड क. पब्लिशर्स.
7) सप्रे, निलीमा. आणि पाटील, प्रिती. (2008). शिक्षणातील विचारप्रवाह. कोल्हापूरः फडके प्रकाशन.
8) सांगोलकर, अरुण. (2011). नवीन जागतिक समाजातील शिक्षणाचे विचारप्रवाह. नाशिकः इनसाईट पब्लिकेशन्स्.



*डॉ.सौ. उज्ज्वला के.सदावर्ते*
*प्राचार्या,विवके वर्धिनी अध्यापिका महाविद्यालय,नांदेड*
*तथा,अधिष्ठाता,शिक्षणशास्त्र विद्याशाखा,स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ Directory Of Research Journal Indexing
- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com